# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,
**{नगर रचना आणि मुल्य वि.}** १९६६ चे कलम-२१(२), ३४ व कलम- ३८ चे अनुषंगाने कलम- २३(१) नुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्राची मूळ हद्दीची विकास योजना (दुसरी सुधारित) व वाढीव हद्दीची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.

नागपूर शहराची विकास योजना दि. ०३/०६/१९७६ रोजी मंजूर झाली असून दि.३०/०७/१९७६ रोजी अंमलात आली. तद्नंतर नागपूर शहराची प्रथम सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) अन्वये शासन अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६-२६४३-प्र.क्र. ३०० (अ)- ९७- नवि-९ दि. ०७ जानेवारी २००० अन्वये भागशः मंजुर झाली असुन दि. ०१ मार्च २००० पासुन अंमलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४०० १६२८-सी. आर. २००-२०००- नवि-९, दि. १०/०९/२००१ अन्वये मंजूर झाली असुन दि. २९/०९/२००१ पासुन अंमलात आलेली आहे.

शासन अधिसुचना क्र. नामपा- २०१२/ प्र. क्र. /नवि- २६ दि. १४/०५/२०१३ च्या अधिसूचनेनुसार मौजा- हुडकेश्वर (बु.) व मौजा नरसाळा ही महसुली गावे नागपूर प्रादेशिक योजनेतून वगळून नागपूर महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४१९-१४९९-प्र.क्र. १५४-२०१९ नवि-९, दि. २७ ऑगस्ट २०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या सात योजनेकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. तद्नंतर नगर विकास विभागाची अधिसुचना टिपीएस-२४१९-१४९९-प्र.क्र.-१५४ (भाग-१)/२०१९/नवि-९ दि. ०९.०४.२०२१ अन्वये नागपूर शहरातील नागपूर सुधार प्रन्यासची ७ योजना वगळून स्मार्ट सिटी अंतर्गतचे मौजा पारडी, भरतवाडा, पुनापूर व भांडेवाडी चे क्षेत्र आणि उर्वरित संपूर्ण क्षेत्राकरिता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरणाचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे.

शासनाचे पत्र. क्र .टिपीएस – २४१९ /१४१९/प्र.क्र.१५/२०२५/नवि-९, दि.२९/४/२०२५ अन्वये *"व्यापक जनहितार्थ, एकात्मिक नियोजनासाठी व नियोजनाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नागपूर सुधार प्रन्यास अधिकारक्षेत्रात येणाऱ्या सात योजना समाविष्ट करून एकत्रितरीत्या नागपूर शहराची दुसरी सुधारित विकास योजना करण्याची कार्यवाही करणेबाबत नागपूर महानगरपालिकेला निर्देशित केले आहेत."* त्यानुषंगाने उक्त अधिनियमाच्या कलम- ३८ व कलम- २३(१) अन्वये नागपूर शहराची मुळ हद्द व वाढीव हद्दीची अंतिम विकास योजना तयार करण्याचे अधिकार नागपूर महानगरपालिकेला प्रदान करण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३८ व कलम २१ (२) अन्वये नागपूर महानगरपालिका क्षेत्राचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी विकास योजना (दु.सु.) तयार करणे आवश्यक आहे. सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम- २१(२), ३४ व कलम- ३८ चे अनुषंगाने कलम- २३(१) अन्वये नागपूर महानगरपालिका

क्षेत्राकरिता मूळ हद्दीची विकास योजना (दु. सु.) व वाढीव हद्दीची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सदर ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.

तसेच ठराव क्र.११/ मनपा/ प्रशासक दि. १४/०५/२०२५ मधील अन्य सर्व मजकूर कायम राहील.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 51/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 12/10/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उप संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम-२१(२), ३४ व कलम- ३८ चे अनुषंगाने कलम- २३(१) नुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्राची मूळ हद्दीची विकास योजना (दुसरी सुधारित) व वाढीव हद्दीची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.

नागपूर शहराची विकास योजना दि. ०३/०६/१९७६ रोजी मंजूर झाली असून दि.३०/०७/१९७६ रोजी अंमलात आली. तद्नंतर नागपूर शहराची प्रथम सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) अन्वये शासन अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६-२६४३-प्र.क्र. ३०० (अ)- ९७- नवि-९ दि. ०७ जानेवारी २००० अन्वये भागशः मंजुर झाली असुन दि. ०१ मार्च २००० पासुन अंमलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४०० १६२८-सी. आर. २००-२०००- नवि-९, दि. १०/०९/२००१ अन्वये मंजूर झाली असुन दि. २९/०९/२००१ पासुन अंमलात आलेली आहे.

शासन अधिसुचना क्र. नामपा- २०१२/ प्र. क्र. /नवि- २६ दि. १४/०५/२०१३ च्या अधिसूचनेनुसार मौजा- हुडकेश्वर (बु.) व मौजा नरसाळा ही महसुली गावे नागपूर प्रादेशिक योजनेतून वगळून नागपूर महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४१९-१४९९-प्र.क्र. १५४-२०१९ नवि-९, दि. २७ ऑगस्ट २०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या सात योजनेकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. तद्नंतर नगर विकास विभागाची अधिसुचना टिपीएस-२४१९-१४९९-प्र.क्र.-१५४ (भाग-१)/२०१९/नवि-९ दि. ०९.०४.२०२१ अन्वये नागपूर शहरातील नागपूर सुधार प्रन्यासची ७ योजना वगळून स्मार्ट सिटी अंतर्गतचे मौजा पारडी, भरतवाडा, पुनापूर व भांडेवाडी चे क्षेत्र आणि उर्वरित संपूर्ण क्षेत्राकरिता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरणाचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे.

शासनाचे पत्र. क्र .टिपीएस — २४१९ /१४१९/प्र.क्र.१५/२०२५/नवि-९, दि.२९/४/२०२५ अन्वये *"व्यापक जनहितार्थ, एकात्मिक नियोजनासाठी व नियोजनाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नागपूर सुधार प्रन्यास अधिकारक्षेत्रात येणाऱ्या सात योजना समाविष्ट करून एकत्रितरीत्या नागपूर*

*शहराची दुसरी सुधारित विकास योजना करण्याची कार्यवाही करणेबाबत नागपूर महानगरपालिकेला निर्देशित केले आहेत."* त्यानुषंगाने उक्त अधिनियमाच्या कलम- ३८ व कलम- २३(१) अन्वये नागपूर शहराची मुळ हद्द व वाढीव हद्दीची अंतिम विकास योजना तयार करण्याचे अधिकार नागपूर महानगरपालिकेला प्रदान करण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३८ व कलम २१ (२) अन्वये नागपूर महानगरपालिका क्षेत्राचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी विकास योजना (दु.सु.) तयार करणे आवश्यक आहे. सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम- २१(२), ३४ व कलम- ३८ चे अनुषंगाने कलम- २३(१) अन्वये नागपूर महानगरपालिका क्षेत्राकरिता मूळ हद्दीची विकास योजना (दु. सु.) व वाढीव हद्दीची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सदर ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.

तसेच ठराव क्र.११/ मनपा/ प्रशासक दि. १४/०५/२०२५ मधील अन्य सर्व मजकूर कायम ठेऊन उपरोक्त प्रस्तावास मा.प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.